मुंबई, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६

# कृषी उत्पन्न दुप्पट वाढविण्याची हमी देणारा केंद्रीय अर्थसंकल्प स्वागतार्ह

**.....कृषी मंत्री एकनाथराव खडसे**

जळगाव, दि.२९ ऑक्टोबर - आगामी काळातील देशाची अन्न-धान्याची गरज भागविण्याच्या दृष्टीने आणि कृषी क्षेत्राची प्रगति साधण्याच्या हेतुने कृषी उत्पन्न दुप्पट वाढविण्याची हामी देणारा केंद्रीय अर्थ संकल्प स्वागतार्ह आहे, अशा शब्दात राज्याचे कृषी मंत्री एकनाथराव खडसे यांनी आपली प्रतिक्रया व्यक्त केलि आहे.

खडसे यानी पुढे म्हटले आहे की शेतक-यांना उत्पन्न सुरक्षा देण्यासाठी ३५९८४ कोटी रुपयांची तरतूद, अन्न प्रक्रिया उद्योगात १०० टक्के थेट परकीय गुंतवणूक, खतावरील अर्थ सहाय्य शेतक-यांच्या बँक खात्यावर जमा करण्यांची व्यवस्था, पंतप्रधान सिंचन योजनेत २८ टक्के वाढ,पंतप्रधान पीक विमा योजनेसाठी ५५०० कोटीची तरतूद, भू-जल संवर्धनासाठी ६००० कोटी, दुग्ध व्यवसयाच्या चार नव्या योजना, पाच लाख एकर जमिनीवर जैव शेती, मनरेगा च्या माध्यमातून पाच लाख तलावांची निर्मिती,
इ-मार्केटिंगवर भर या आणि इतर भरीव तरतुदीमुळे शेतीला निश्चितपणे 'अच्छे दिन' येतील.

या अर्थसंकल्पाने शेती आणि शेतकरी यांना फार मोठा दिलासा दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार दिलेल्या वचनानुसार कार्य करीत असल्याचे प्रतिबिम्ब या अर्थ संकल्पात दिसून येते, असे खडसे यांनी केंद्रीय अर्थ संकल्पावर आपले भाष्य करताना म्हटले आहे.

......